## खर्चासाठी दिलेले पैसे परत न दिल्याने झालेल्या खुनाच्या गुन्ह्यातील २ आरोपी, युनिट-३ गुन्हेशाखा पुणे शहर कडून जेरबंद

---

दिनांक २५.०६.२०१९ रोजी रात्रौ २२.३० वा.चे सुमारास मयत शाहरूख नुरहसन खान व त्याचे मित्र हे शिवनेरीनगर कोंढवा खुर्द पुणे येथील गव्हाणे क्रिडांगणाच्या पलीकडे पारसी मैदान पुणे येथे गप्पा मारत बसले असताना, यातील आरोपी सोन्या ऊर्फ महेश मिसाळ व त्याचे इतर २ ते ३ साथीदारांनी सदर ठिकाणी येवून त्यांचे हातातील कोयत्यांनी व बाजुस असणारे सिमेंटची विट व गट्टु यांनी मारून जिवे ठार मारल्याने कोंढवा पोलीस ठाणेस गु.र.नं ५७५/२०१९ भा.दं.वि.क ३०२,३४, आर्म ॲक्ट ४,२५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

यातील आरोपी यांनी मयत इसमास अतिशय निघृणरित्या ठार मारले होते. दाखल गुन्हा हा संवदेशनशील असल्याने दाखल गुन्ह्याचा समांतर तपास मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाप्रमाणे श्री राजेंन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनिट-३, व त्यांचा अधिनस्थ स्टाफ असे करीत असताना, युनिट-३ कडील सहा.पो.फौजदार किशोर शिंदे व पो.हवा संतोष क्षिरसागर यांना मिळालेल्या बातमीवरून, आरोपीत १. महेश उर्फ सोन्या शिवाजी मिसाळ वय २२ वर्ष रा. शिवनेरीनगर कोंढवा पुणे व २. आकाश गंगाराम बावळेकर वय २३ वर्ष रा.सर्वे नं ३५४, राममंदिरजवळ,कोंढवा खुर्द पुणे यांना दिनांक २७.०६.२०१९ रोजी ताब्यात घेवून त्यांचेकडे केले तपासात, त्यांनी दाखल गुन्हा हा मयत इसमास पुर्वी दिलेले पैसे परत न दिल्याने व दिनांक ०५.०६.२०१९ रोजी यातील आरोपीत क्रं १ याचे लहान भावास मारहाण केल्याचे कारणावरून चिडून जावून गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

वरील कामगिरी गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, श्री. शिरीष सरदेशपांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे-१, श्री. समीर शेख, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंन्द्र मोकाशी, पोलीस उप निरीक्षक श्री. किरण अडागळे, श्री. संजय गायकवाड, श्री.राजकुमार केंद्रे सहा.पो.उप निरीक्षक किशोर शिंदे, संतोष क्षिरसागर, मेहबुब मोकाशी, दत्तात्रय गरूड, राहुल घाडगे, गजानन गाणबोटे, संदीप राठोड, अतुल साठे, कल्पेश बनसोडे, सुजीत पवार यांनी केली आहे.